पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ नागरी क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांमधून पाणी उचलण्यास नगर परिषद/पालिकांना द्यावयाचा मोबदला.

# महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र. टंचाई २४०६/प्र.क्र.१४२ /पापु १४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ जुलै, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु१४ दि.१ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु१४ दि.३ फेब्रुवारी १९९९

परिपत्रक :-

संदर्भाधीन स्थायी आदेशानुसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टँकरद्धारे पाणी पुरवठा करताना नगर परिषदा/नगर पालिका महानगर पालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा योजनांमधून पाणी उचलण्यास संबंधीत नगर परिषदा नगर पालिका/महानगर पालिका यांना कोणत्या दरांने मोबदला अदा करावा यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी विचारणा करण्यात येते पाणी पुरवठा योजना राबविताना या स्थानिक संस्थाना बराच खर्च येत असतो. टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत विहिर अधिग्रहण अधिनियमानुसार, टँकर भरण्यासाठी विहिरी/विंधण विहिरी जलाशय अधिग्रहीत केले जातात व त्यासाठी अधिनियमातील विहित तरतुदीनुसार अधिग्रहण मोबदला संबंधितांना अदा केला जातो. नागरी क्षेत्रामध्ये नियमित पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात ग्रामीण भागात जेव्हा मोठ्या प्रमाणावर नागरी पाणी पुरवठा योजनांमधून टँकर भरुन घेतले जातात तेव्हा त्यांना अधिग्रहण अधिनियमानुसार मोबदला देणे व्यवहार्य ठरत नाही. सबब, खर्चापेक्षा मोबदला कमी मिळत असल्याने संबंधित नगर परिषदा/नगर पालिका प्रति टँकर विशिष्ट दराने मोबदला देण्याची मागणी करतात.

यासंदर्भात शासनाकडे विविध स्थानिक संस्थाकडून प्राप्त झालेल्या मागण्या विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात नागरी भागातील नियमित पाणी पुरवठा योजनांच्या जलशुध्दीकरण केंद्रे व साठवण टाक्या यावरुन टँकरद्धारे पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी भरुन घेतल्यावर

संबंधीत नगर परिषदा/नगर पालिका/महानगर पालिका यांना ते संबंधीत क्षेत्रात घरगुती वापरासाठी मिटर पध्दतीने १००० लिटरसाठी ज्या दराने पाणी पुरवठा करतात तो दर आधारभूत मानून (प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या टँकरच्या क्षमतेनुसार) १००० लिटरसाठी रु.१०.०० या कमालमर्यादेत मोबदला अदा करण्यास हरकत नाही. मात्र अशा प्रकारे मोबदला अदा करताना खालील बाबींची पूर्तता होईल याची काळजी घेण्यात यावी.

(अ) टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यास्तव पाणी भरुन घेण्यासाठी नियमित योजनांच्या जलशुध्दीकरण केंद्रे/साठवण टाक्या यांचा वापर अपवादात्मक परिस्थितीत करण्यात यावा. तसे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी यांनी काढावेत.

(ब) संबंधीत नगर पालिकांनी पाणी वाहून आणण्यासाठी ते शुध्द करण्यासाठी, उचलण्यासाठी खर्च केलेला आहे. अशा परिस्थितीतच हा मोबदला त्यांना प्रदेय राहील. उदा. एखाद्या योजनेच्या उद्‌भवातून अशा प्रकारे पाणी घेतल्यास त्याचा मोबदला संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेस देता येणार नाही.

(क) अशा पध्दतीने पाणी उचलताना प्रत्यक्ष किती क्षमतेचे टँकर उपयोगात आणले जात आहेत, तसेच टँकरच्या फे-यांची व्यवस्थितरित्या नोंद ठेवली जात आहे याची काळजी संबंधीत अधिका-यांनी घ्यावी.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन शासकीय निधीचा सुयोग्य उपयोग होईल, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(भि. ना. पतिंगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद (सर्व)
आयुक्त महानगर पालिका (बृहन्मुंबई वगळून)
मुख्याधिकारी नगर पालिका (सर्व)
पापु-१४ संग्रहासाठी

E:\CR 142- 06 mobadla.doc

७९२